ISSN-2320-44
RNI No.MAHAUL03008/13/2012-
UGC Approve

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME : I ISSUE II Oct to Dec 2017



Chaken 410505 Dist-Pune

UGC Approved Sr.No.45681

ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION | SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | अकाल मे भारतीय अर्थव्यवस्था प्रगती मे सबसे आगे | प्रा.डॉ. शिवाजी भ. यादव | ५७ |
| १५ | जिल्हा नियोजन व विकास प्रक्रियेत जिल्हा नियोजन समितीची भूमिका: बीड जिल्हा एक अभ्यास | डॉ.राजेंद्र जी. गोडबोले, डॉ.सुहास आर. मोराळे | ६० |
| १६ | Samrat Upadhyay's 'Arresting God in Kathmandu': A Reflection of Distracted Relationship in Nepalese Society | Digambar Madhukarrao Date | ६४ |
| १७ | इतिहास लेखनातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह | प्रा. जाधवर बी.डी. | ७० |
| १८ | मनाची वारूळं' या ललित लेखसंग्रहातील निसर्गाचा आपुलकीपणा | प्रा. डॉ. दादासहेब गिऱ्हे | ७२ |
| १९ | संत कबीर काव्य पर विविध संप्र... | डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | ७४ |
| २० | मराठी भाषेपुढील आव्हाने | डॉ. रेखा वाघ | ७८ |
| २१ | महिला सबलीकरणाची सामाजिक अपरिहार्यता | प्रा. राजेंद्रकुमार घाडगे | ८१ |
| २२ | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि स्त्रिया | प्रा. लक्ष्मण करपे | ८५ |
| २३ | बाबाराव मुसळे यांचे कथालेखान | डॉ. सोपान सुरवसे | ८७ |
| २४ | लोकसाहित्य संज्ञा व स्वरुप | डॉ.भाऊसाहेब राठोड | ९४ |
| २५ | प्रवासवर्णन एक साहित्य प्रकार : एक दृष्टिक्षेप. | प्रा.म्हस्के सीताराम खंडू | ९८ |
| २६ | आदिवासींचा देव वाघदेव | प्रा. डॉ. दिलीप कसबे | १०५ |


C.S.M's Arts & Com. College Chakan 410505 Tal-Khed, Dist-Pune.

C.S.M's Arts & Commerce College,
Chakan,Tal-Khed Dist-Pune.

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue II Oct to Dect.2017 ISSN 2320- 4494 Impact factor

# कलावंतांचा आधारवड: शाहीर बशीरभाई मोमीन कवठेकर

प्रा. डॉ. दिलीप कसबे
मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय चाकण

शाहीर बशीरभाई मोमीन कवठेकर उर्फ बी.के. मोमीन कवठेकर यांना नुकताच "विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव" पुरस्कार महाराष्ट्र शासनाने जाहीर केला. मला मनापासून आनंद झाला. कारण मी त्यांच्या सहित्यावर पीएच. डी. करून त्यांना प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला. ऑक्टोबर २०१० साली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मला पीएच. डी प्रदान केली आहे. त्यांच्या साहित्याचा परिचय व्हावा यासाठी हा अल्पसा प्रयत्न.

बशीरभाई मोमीन कवठेकर यांचा जन्म १मार्च १९४७ साली कवठेयेमाई ता. शिरूर जि. पुणे येथे गरीब कुटुंबात झाला. वयाच्या १४व्या वर्षी त्यांनी पहिले गीत लिहीले. हे गीत कार्यक्रमात सादर झाले.आणि बक्षिसही मिळाले. इथून त्यांच्या गीत लेखनाचा प्रारंभ झाला. प्रसिध्द गीतकार कवी लक्ष्मण राजगुरु व चलते कवी चंदुलाल त्यांच्याकडून त्यांना स्फूर्ती मिळाली. घरच्या परिस्थितीमुळे व प्रकृतीमुळे नववीतून शाळा सोडावी लागली. कवठेयेमाई हे गाव लोककलावंताचे व तमाशा कलावंताचे माहेरघर त्यामुळे ते तमाशाकडे आकर्षित झाले. "तांबड फुटल रक्ताचं, इष्कानं घेतला बळी, फुटला पाझर पाषाणला,भंगले स्वप्न महाराष्ट्रा,भक्त कबीर, हुंडयापायी बळी गेले." इ. वगनाटय तर "सोय–याला धडा शिकवा, दारू सुटली चालना भेटली,मनाला आळा एडस् टाळा," इ. आकाशवाणीसाठी लोकनाट्ये लिहीली.

"भांगले स्वप्न महाराष्ट्रा" हे ऐतिहासिक नाटक त्यांनी लिहीले. गावातील हौशी लाकरांनी ते सादर केले.पुण्यातील भरत नाटय मंदीरात त्याचे प्रयोग झाले. कवठेकरांची भूमिका लोकांना आवडली. प्रेक्षक प्राण ओतून नाटक पाहात होते. शिट्या आणि टाळ्यांचा कडकडाट झाला." त्रिदल" प्रकाशन संस्थेने त्याचे प्रकाशन केले. "भ्रमाचा भोपळा" या नाटकातील छक्क्याची व छत्रपती शिवाजी महाराज याही भूमिका गाजल्या. पण नाटयक्षेत्र व आकाशवाणीपेक्षा ते तमाशाक्षेत्रातच जास्त रमले. "भंगले स्वप्न महाराष्ट्रा या नाटकाचे वगनाटयात रूपांतर केले. रघुवीर खेडकर सह कांताबाई सातारकर या तमाशा फडाने ते महाराष्ट्रभर ते सादर केले. त्यातील गीते अतिशय गाजली. बबन हाडशीकरांनी गायलेले "चाललीही जवानी तुझी वाया का ग लवतीस मला झुरया" या गीताने रसिक–प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. प्रचंड लोकप्रियता मिळली. आणि तमाशा सृष्टीतील आघाडीचे गायक संगीतरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांनी त्यांची गीते



Principal
C.S.M's Arts & Commerce Co
Chakan, Tal-Khed, Dist-Pune